**Nasik Daily Newspaper - SAKAL**

# सनड्रॉप गोल्ड लाइट बाजारात

**नाशिक, ता. ३० :** अमेरिकेतील कॉन ॲग्रा फूड्सशी संलग्न कंपनी असलेल्या ॲग्रो टेक फूड्स लिमिटेडने आज सनड्रॉप गोल्डलाइट हा सनड्रॉप खाद्यतेलाचा नवा प्रकार बाजारात सादर केल्याची घोषणा नुकतीच करण्यात आली आहे.

सनड्रॉप तेल मालिकेतील गोल्ड लाइट हा नवा प्रकार चवदार रिफाइन्ड वनस्पती तेलापासून बनवलेला आहे.

गोल्ड लाइटमध्ये मक्यापासून काढलेले तेल (४० टक्के) आणि सूर्यफुलापासून काढलेले तेल (६० टक्के) यांचे मिश्रण आहे. इतर खाद्यतेलांच्या मानाने गोल्डलाइट जास्त आरोग्यकारक आहे. ते ७५ रुपये किमतीला उपलब्ध आहे, असे कंपनीतर्फे कळविण्यात आले आहे.